**अनुदानित**

पुणे जिल्हा परिषद ,पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग माध्यमिक
जा क्र शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ ९७२/ २०१४
पुणे १ दिनांक २६/११/२०१४

प्रति ,

अध्यक्ष / सचिव / मुख्याध्यापक
आदर्श सार्वजनिक विश्वस्त संस्था संचलित
आदर्श माध्य विदयालय दळवीनगर ,मुंढवा ,पुणे

**विषय :- बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांचा नियम ११ पोटनियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणे बाबत .**

आपला दिनांक १५.२.२०१४ च्या अर्जाच्या संदभ्रत आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्याहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे .

मी शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) पुणे जिल्हा परिषद ,पुणे दिनांक ०१ एप्रिल २०१३ पासून दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता ८ वी च्या वर्गाकरता **आदर्श सार्वजनिक विश्वस्त संस्थो** संचलित **आदर्श माध्य विदयालय दळवीनगर ,मुंढवा ,पुणे** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे
वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतद मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.
२) बालंकाना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियत २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ ( जोडपत्र दोन ) शाळा पालन करील .
३) शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्यपा इयत्तेतील विद्यर्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेशदेईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतू आणखी असे की पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीदेखील याप्रमाणे अनलुपालन करण्यात येईल.
४) परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमांच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला सव्तंत्र बँक खाते देण्यात येईल.
५) संसथा / शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वूसल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या- पित्यास किंवा पालकांस भाग पाडणार नाही.
६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म जात किंवा वंश जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही .
७) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होइपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही
(दोन) कोणत्याही बालकास शारीरीक शिक्षा किंवा मानसक त्रास देण्यात येणार नाही
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीखा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही
(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.
(पाच ) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विदर्यांचा अधिनियमांच्या तरतुदीनुसार समोवेश करणेत येईल .
(सहा) अधिनियमांच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांचय नियुक्ती करण्यात येईल परंतु आणखी असे की अधिनियमांच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल .
(सात ) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि
(आठ) शिक्षकाने/ शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेवू नये याची सुनिश्चिती शाळा करेल .

८) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्राच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलबध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमांच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या

| | | | |
|---|---|---|---|
| शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | :-७४३ चौ मी | | |
| एकूण बांधकामाचे क्षेत्र | :-३२५ चौ.मी | | |
| खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | :-४१८चौ.मी | | |
| वर्ग खोल्यांची संख्या | :-०६ | | |
| कार्यालय नि भांडार नि मुख्याध्यापकांची खोली | :-०१ | | |
| मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? | | मुले | मुली |
| | संडास | ०१ | ०७ |
| | मुता-या | ०१ | ०७ |

पिण्याच्या पाण्याची सुविधा :-पाण्याची टाकी
दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर :- केंद्रिय पध्दतीने शा पो आहार दिला जातो.
अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडाविषयक सामुग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता :- आहे
वाचन साहित्य विनासायास उपलब्ध :- आहे ( पुस्तकसंक्ष्या :६४५ , वर्तमानपत्रे :- ००, नियतकालिके :- ०२)

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील

१३) शाळा सोसासयटी नोंदणी नियम १८६०(१८६० चा २१) किंव मुंबई सार्वजनिक विस्त वय्वस्था अधिनियम १९५० अन्वये नोदणी झालेल्या संसथेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४)शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा व्यक्ती संघ्ज्ञाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तींच्या फायदयाकरीता किं कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही

१५)शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठवण्यात यावी

१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक माध्य/अनु/एसएससी/म/पीएमसी/ /२०१३-१४ असा आहे तसेच आपल्या शाळेचा U DISE No २७२५१७०११०८हा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोद घ्यावी

१७)मा शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादनर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पूर्तता करण्यासाठी किवा शाळेच्या कामकाजातील त्रंटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी

१९) जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

शिक्षणाधिकारी ( प्राथमिक )
पुणे जिल्हा परिषद ,पुणे